संक्षिप्त फौजदारी केस क्र.२९/२०२४
सरकार (महा.शासन)
-वि-
चिदानंद म्हेत्रे + ०१

नि. क्र.३५

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ याची साक्ष</u> -

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव : नंदकुमार चंद्रकांत गोसावी,
वय सुमारे : ५३ वर्षे, धंदा - नोकरी,पो.उ.नि. महामार्ग,
राहणार : ओरोस, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

----------------------------------------

<u>**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.जी.आर. माजगावकर यांचे मार्फत -**</u>

**१.** सन २०२० पासुन सन २०२५ पर्यंत मी ओरोस पोलीस ठाणे येथे चालक या पदावर कार्यरत होतो. दिनांक २१/०१/२०२४ रोजी कुंदे गावात दोन गटात देवस्थानचे वाद होते. त्यामुळे आम्ही पेट्रोलींग करीता गेलो होतो. माइ-यासोबत म.पो.हे.कॉ.१३४ नागरगोजे व म.पो.कॉ.१२५५ पावस्कर होते. आम्ही सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीता चाललो होतो. आम्ही मुंबई-गोवा महामार्गावर कसाल च्या दिशेने पेट्रोलींग करीत चाललो होतो. खर्येवाडी येथे ओट्रा रेसिडन्सी येथे रस्त्याच्या कडेला लोक जमलेले होते. मी तेथे गाडी थांबवुन आम्ही सर्व खाली उतरलो. म.पो.हे.कॉ.१३४ नागरगोजे व पो.कॉ. पावस्कर यांनी तिथे जमलेल्या लोकांकडे चौकशी केली. एक वृध्द महिला त्या ठिकाणी जखमी होवुन पडल्याचे आम्हाला दिसले. सदर महिलेच्या बाजुला एक बुलेट मोटारसायकल रस्त्याच्या बाजुला पडलेली दिसली. सदर बुलेट मोटारसायकलचा नोंदणी क्रमांक एमएच-०७-१६०० असा होता. मोटारसायकलच्या पुढे कसालच्या दिशेने एक ट्रक ज्याचा नोंदणी क्र.एम.एच.०९ सी.व्ही. ३३३५ उभा असलेला दिसला.

**०२.** सदर जखमी महिलेस आम्ही तिच्या पतीच्या व जमलेल्या लोकांच्या सांगण्यावरून शासकीय वाहनाने एस.एस.पी.एम. हॉस्पीटलला

नेले. व तेथुन पुढे आम्ही पेट्रोलींगला निघुन गेलो. सदर महिलेचा अपघात वरील नमुद ट्रकमुळे झाल्याचे आम्हाला समजले होते. या संदर्भात पोलीसांनी माइ-याकडे चौकशी केली होती. ट्रक चालकास मी पाहिले होते. त्याला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आरोपीची गैरहजेरी नि.क्र.३४ कडील अर्जान्वये माफ करण्यात आली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत-</u>**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलींगला जाण्यापुर्वी त्याची नोंद स्टेशन डायरीला केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनात लॉग बुक रजिष्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाच्या लॉग बुक रजिष्टरमध्ये ते वाहन कोठुन कोठे गेले हे नमुद केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनाचा लॉग बुक उतारा मी स्वत:हुन तपासिक अंमलदाराला दिला नाही किंवा त्यानेही माइ-याकडुन मागीतले नाही.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाणे येथे ड्युटी बटवडा रजीष्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, तपासिक अंमलदाराने ड्युटी बटवडा रजीष्टर हस्तगत केले नाही व मी सुध्दा त्यांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्यानंतर आम्ही त्या ठिकाणी पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघात कोणाच्या निष्काळजीपणामुळे घडला होता हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताबाबतची मला समजलेली माहिती ही ऐकीव माहिती आहे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या ठिकाणी ओट्रा रेसिडन्सी पार्क आहे व त्या ठिकाणी बरेच निवासी फ्लॅटधारक निवास करतात. हे म्हणणे

खरे नाही की, अपघाताच्या ठिकाणी पॉपलीन बार आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या ठिकाणापासुन थोडे चढावाचा पुढे वळणाचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, महामार्गावर दिवस रात्र वाहनांची वर्दळ असते.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा कथीत गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइ-या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी चुकीचा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास – नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2026.06.18 17:16:21 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

ठिकाण :- ओरोस
दिनांक :- १८/०६/२०२६.

**( श्रीमती एस.ए.कानशिडे )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग-ओरोस.